# प्रेसनोट दि. १४/०८/२०१९

## तब्बल १९ वर्षापासुन सोन्याच्या व्यापा-यावर सशस्त्र दरोडा टाकुन पाहिजे असलेला आरोपीस युनिट - १, गुन्हे शाखा, पुणे शहर यांचेकडून जेरबंद

-----ooo----------ooo----------ooo----------ooo-----

दि.२२/०३/२००० रोजी सायंकाळी ०७/४५ वा.चे सुमारास इंदरमल जैन वय ४२ रा. परळ, मुंबई हे सोन्याचे व्यापारी मंबई वरुन सोने विकण्यासाठी पुण्यातील ज्वेलसकडे आले होते सोने विकुन मिळालेली १,८६,८५०/- रोख रक्कम घेवुन मुंबईला जाण्यासाठी रिक्षाने पुणे स्टेशन कडे जात असताना रास्तापेठ येथील ताराचंद हॉस्पीटल समोर अनोळखी इसमांनी त्यांची रिक्षा अडवुन त्याचेवर मिरची पुड टाकुन चॉपर व कोयत्याने वार करून पैश्याची बॅग हिसकावुन नेले बाबत त्यांचे पार्टनर अशोककुमार जैन रा काळा चौकी,मुंबई यांनी फिर्याद दिल्याने समर्थ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर ४८/२००० भादवि कलम ३९५,३९७ प्रमाणे सशस्त्र दरोडयाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. त्यापैकी काही आरोपी दाखल गुन्हयांत अटक करण्यात आले होते सदर गुन्ह्यात राजु गायकवाड रा. मु.पो. दिवे, ता. पुरंदर जिल्हा पुणे हा गुन्हा दाखल झाले पासुन सुमारे **१९ वर्षापासुन फरार होता.**

दि.१३/०८/२०१९ रोजी युनिट -१, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडील अधिकारी व कर्मचारी समर्थ पोलीस ठाणेचे हद्दीत पेट्रोलिंग करिता असताना पोलीस कर्मचारी अमोल पवार यांना बातमीदारामार्फत मिळाली की सदर गुन्हयांत १९ वर्षापासुन फरारी असलेला आरोपी नामे राजु गायकवाड हा कनक हॉटेल समोर शंकरशेठ रोडवर उभा आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्या बाबत वरिष्ठांना माहिती देवुन परवानगीने युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर पथकाकडील स्टाफसह बातमी प्रमाणे जावुन नमुद आरोपीस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव राजु जगन्नाथ गायकवाड,वय ४५ वर्ष रा मु.पो. दिवे, ता. पुरंदर जिल्हा पुणे असे असल्याचे सांगीतले. त्याचेकडे समर्थ पोलीस स्टेशनकडील वरील दाखल गुन्हयाचे अनुशंगाने त्यांस विश्वासात घेवुन तपास करता त्याने सांगितले की, मी व इतर साथिदार असे आम्ही ताराचंद हॉस्पीटल समोर रिक्षा अडवुन मिरची पुड टाकुन चॉपर व कोयत्याने वार करून मुंबईच्या सोन्याच्या व्यापा-याची पैश्याची बॅग हिसकावुन घेवुन गेलो होतो. त्यावेळी मी सुध्दा त्यांचे बरोबर होतो व सदर गुन्हा दाखल झाले पासुन सुमारे १९ वर्षापासुन मी फरार आहे.असे कबुल केल्याने आरोपीस पुढील कारवाई कामी समर्थ पोलीस स्टेशन,पुणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री बच्चन सिंह, यांचे मार्गदशनाखाली युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पोलीस उपनिरीक्षक हनुमंत शिंदे, पोलीस कर्मचारी योगेश जगताप, अमोल पवार, वैभव स्वामी, अजय थोरात, अनिल घाडगे यांनी केली आहे.

वरीष्ठ पोलीस निरीक्षक

युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर